महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्र.०२२-२२०४८२४७

क्रमांक : गौखनि-२७/०६१८/प्र.क्र.२८४/ख

महसूल व वन विभाग, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ३० मे, २०१९.

विषय : गौण खनिज-ठाणे

मौजे खोणी, हेदुटणे व अंतर्ली, ता.कल्याण, जि.ठाणे या जमिनीवर करण्यात आलेले गौण खनिजाच्या उत्खननाचा वापर त्याच ठिकाणी केला असल्याने आगाऊ शासनजमा केलेली स्वामित्वधनाची रक्कम परत करणेबाबत.

मे.पलावा डेव्हलपर्स प्रा.लि.,

शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग क्र.गौखनि-२७/०६१८/प्र.क्र.२८४/ख, दि.२४ जानेवारी, २०१९ निरसित करण्यात येवून सुधारित ज्ञापन खालीलप्रमाणे :-

शासन ज्ञापन:

विभागीय आयुक्त कोकण यांना त्यांचे पत्र क्र. मशा/कार्या-९/गौखनि/कावि-१३६/ २०१६, दि.१२/०६/२०१८ तसेच जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या क्र.रेतीगट/गौख/कावि-३२१/२०१९, दि.१३/५/२०१९ रोजीच्या उपरोक्त विषयावरील पत्रास अनुलक्षून असे कळविण्यात येते की, मौजे खोणी, हेदुटणे व अंतर्ली, ता.कल्याण, जि.ठाणे येथील स.नं. १४९/४ व इतर एकुण क्षेत्र १३०० हे.आर या जमिनीवर विकासकाम करीत आहेत. मे.पलावा डेव्हलपर्स प्रा.लि., यांनी भविष्यात या प्रकल्पांतर्गत उत्खनन होणाऱ्या गौण खनिजापोटी भरावी लागणारी स्वामीत्वधनाची आगाऊ रक्कम रुपये ४.०० कोटी (रुपये चार कोटी मात्र) धनाकर्षाद्वारे जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे दि.३१/०३/२०१६ रोजी शासनजमा केली आहे.

०२. विकासकामार्फत सदर भूखंडाचा विकास करतांना सुमारे ७४,६०० ब्रास गौण खनिजाचे उत्खनन केले असून, त्यापैकी सुमारे ४१,६०० ब्रास गौण खनिजाचा वापर त्याच जागेवर भरावासाठी केला असून उर्वरित ३३,००० ब्रास गौण खनिज साठा जागेवर करुन ठेवलेला असल्याचे आढळून आलेले आहे. सदर कंपनीने उत्खनन केलेले गौण खनिज विकसीत करीत असलेल्या भूखंडामध्येच वापर केला असून भूखंडाचे बाहेर वाहतूक केल्याचे दिसून येत नाही, असा अहवाल उपविभागीय अधिकारी, कल्याण यांनी सादर केला आहे.

०३. शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र.गौखनि-१०/१०१२/प्र.क्र.६०३/ख, दि.११/०५/२०१५ मध्ये ज्यावेळी जमीनीच्या एखाद्या भूखंडाचा विकास करताना मातीचे उत्खनन करून ती माती त्याच भूखंडाच्या सपाटीकरणाकरिता वापरली जाईल किंवा ती अशा भूखंडाच्या विकासाच्या प्रक्रियेतील कोणत्याही कामासाठी वापरली जाईल, त्यावेळी अशा मातीवर स्वामित्वधन भरले जाणार नाही" अशी तरतूद करण्यात आली आहे. उक्त तरतूदीच्या अनुषंगाने मे.पलावा डेव्हलपर्स प्रा.लि., यांनी मौजे खोणी, हेदुटणे व अंतर्ली, ता.कल्याण, जि.ठाणे येथील भूखंडावरील गौण खनिजाच्या उत्खननापोटी आगाऊ शासनजमा केलेली स्वामित्वधनाची रक्कम रुपये ४.०० कोटी (रुपये चार कोटी मात्र) परत करण्याबाबत दि.२४ जानेवारी,२०१९ रोजीच्या शासन ज्ञापनान्वये विभागीय आयुक्त, कोकण विभाग तसेच जिल्हाधिकारी, ठाणे यांना कळविण्यात आले होते. तथापि, सदरचे ज्ञापन विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी मान्यता घेऊन त्यांचे कार्यालयामार्फत जिल्हाधिकारी, ठाणे यांचे कार्यालयास माहे, मार्च,२०१९ मध्ये प्राप्त झाले आहे. त्यावेळी जिल्हाधिकारी, ठाणे कार्यालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी सार्वजनिक लोकसभा निवडणूक-२०१९ च्या कामामध्ये व्यस्त असल्याने सदर ज्ञापनानुसार परताव्याची रक्कम दि.३१/३/२०१९ पुर्वी खर्ची झालेली नसल्याचे जिल्हाधिकारी, ठाणे यांनी त्यांच्या दि.१३/५/२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. आता सदर देयक सन २०१९-२० या आर्थिक वर्षामधील उपलब्ध तरतूदीतून रुपये ४.०० कोटी (रुपये चार कोटी फक्त) परतावा करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

०४. सबब, विकासक मे.पलावा डेव्हलपर्स प्रा.लि., यांना रुपये ४.०० कोटी **(रुपये चार कोटी फक्त)** इतकी रक्कम, त्यांनी स्वामित्वधनाची रक्कम प्रत्यक्षात शासनाकडे जमा केल्याची व यापूर्वी ही रक्कम अदा केलेली नाही याची खातरजमा करुन घेण्याच्या अटीवर अदा करण्यास या शासन ज्ञापनाद्वारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

०५. याबाबीवर होणारा खर्च सन २०१९-२०२० या वर्षाकरीता लेखाशिर्ष, "०८५३- अलोहयुक्त खाणी व धातुशास्त्रीय उद्योग "१०२-खनिजबाबत सवलत फी व स्वामित्वधन, ९००, अलोहयुक्त खाणकाम व धातुशास्त्रीय उद्योग - वजा परतावे (००) (०१) वजा परतावे (०८५३ ००८६)" खाली उपलब्ध असलेल्या अंदापत्रकीय तरतूदीमधून खर्ची टाकून भागविण्यात यावा.

०६. सदर ज्ञापन वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक १९४/ २०१९/ व्यय-९, दिनांक १७/०५/२०१९ अनुसार दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०५३०१९१३४९२३१९ असा आहे. हे ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

RAMESH SHIVAJI CHAVAN

Digitally signed by RAMESH SHIVAJI CHAVAN
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=7ada4e8fa11566f3b9c9f7b5fa123945d54f8e3d5b09d05bedfa09b97ee45cad, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=eb458b05e05ee27f435bd399537405d44e1c88021cf038b060ac10b9d8fb8787, ou=REVENUE, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=RAMESH SHIVAJI CHAVAN
Date: 2019.05.30 19:19:51 +05'30'

(रमेश चव्हाण)
उप सचिव, महसूल व वन विभाग

प्रति,

विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई -४०० ६१४.

प्रत :

१) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, प्रतिष्ठा भवन, १०१, महर्षि कर्वे भवन, न्यू मरीन लाईन्स, मुंबई - ४०० ०२०.
२) प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, प्रतिष्ठा भवन, १०१, महर्षि कर्वे भवन, न्यू मरीन लाईन्स, मुंबई- ४०० ०२०.
३) जिल्हाधिकारी, ठाणे.
४) जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे.
५) वित्त विभाग, (व्यय-९/अर्थसंकल्प-३/६/१४/साधनसंपत्ती कार्यासने) मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०० ०३२.
६) कार्यासन अधिकारी (ब-१ कार्यासन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई -४०० ०३२.
७) निवडनस्ती “ख” कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई -४०० ०३२.